


दैनिक सोलापूर
सायं कटूसत्य
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com
सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ६१ वा | बुधवार दि. २३ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR




# पदवीधर–शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीचा बिगुल!

## पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबरला मतदान; २७ ऑक्टोबरला मतमोजणी

पुणे, (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने राज्यातील राजकीय हालचालींना वेग येणार आहे. भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार या दोन्ही मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान, तर २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संबंधित मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाचे विद्यमान सदस्य अरुण लाड आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे विद्यमान सदस्य जयंत आसगावकर यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे त्यांच्या जागी नवीन सदस्य निवडण्यासाठी ही निवडणूक होत आहे.

**२९ सप्टेंबरला अधिसूचना**

निवडणूक कार्यक्रमानुसार २९ सप्टेंबर २०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होईल. ६ ऑक्टोबर ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख आहे. दाखल अर्जांची छाननी ७ ऑक्टोबरला, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ९ ऑक्टोबर आहे.

यानंतर निवडणूक प्रचाराला प्रत्यक्ष वेग येणार असून पदवीधर आणि शिक्षक मतदारांशी संपर्क साधण्यासाठी उमेदवार तसेच राजकीय पक्षांकडून विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू होतील.

**२३ ऑक्टोबरला मतदान**

पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मतदानानंतर मतपेट्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येतील आणि २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी केली जाणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.




पुणे विभागाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी निवडणूक कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर संबंधित सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि प्रशासकीय यंत्रणांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

**पदवीधर-शिक्षक मतदारसंघांवर लक्ष**

विधान परिषदेतील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांचे स्वरूप इतर विधानसभा किंवा लोकसभा मतदारसंघांपेक्षा वेगळे आहे. या मतदारसंघांसाठी स्वतंत्र मतदारयादी तयार केली जाते. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून २०२६ साठी पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या अंतिम मतदार याद्याही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाच्या अंतिम मतदार यादीची तयारी १ नोव्हेंबर २०२५ ही पात्रता तारीख धरून करण्यात आली असून अंतिम मतदार यादी १२ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. शिक्षक मतदारसंघासाठीही याच पात्रता तारखेच्या आधारे अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**उमेदवार निश्चितीला वेग येणार**

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे आता विविध राजकीय पक्षांकडून उमेदवार निश्चितीची प्रक्रिया वेग घेण्याची शक्यता आहे. विद्यमान सदस्यांच्या कार्यकाळाच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांकडून पक्षश्रेष्ठींकडे उमेदवारीसाठी प्रयत्न सुरू होण्याची शक्यता आहे.

पुणे विभागातील पदवीधर आणि शिक्षक मतदारांचा संपर्क वाढविणे, मतदार याद्यांची पडताळणी, संघटनात्मक तयारी आणि प्रचाराचे नियोजन याकडे आगामी काळात राजकीय पक्षांचे लक्ष राहणार आहे. मात्र, कोणत्या पक्षाकडून कोणाला उमेदवारी मिळते आणि निवडणुकीच्या मैदानात प्रत्यक्ष किती उमेदवार उतरतात, यानंतरच लढतीचे स्वरूप स्पष्ट होणार आहे.

**शिक्षक-पदवीधर प्रश्नांना केंद्रस्थानी आणण्याची संधी**

या निवडणुकीच्या निमित्ताने शिक्षण क्षेत्रातील प्रश्न, शिक्षकांच्या सेवा-संबंधित मागण्या, शैक्षणिक संस्थांमधील बदल, रोजगाराच्या संधी, पदवीधरांच्या समस्या, स्पर्धा परीक्षा आणि युवकांच्या रोजगाराचा मुद्दा यांना प्रचारात महत्त्व मिळण्याची शक्यता आहे.

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया स्वतंत्र स्वरूपाची असल्याने मतदारांना मतदानासाठी आपले नाव संबंधित मतदारयादीत आहे की नाही, याची खात्री करणे महत्त्वाचे ठरणार आहे. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर या मतदारसंघांच्या मतदार याद्या आणि संबंधित निवडणूक माहिती उपलब्ध आहे.

**आचारसंहिता लागू; प्रशासनाची कसोटी**

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

(पान २ वर)

## सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक बिनविरोध करा
## राजन पाटील यांचे आवाहन, विरोधकांची भूमिका काय?

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप नेते, माजी आमदार आणि सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील यांनी विरोधकांना निवडणूक बिनविरोध करण्याचं आवाहन केलंय.

राज्यात सध्या दुष्काळ स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर सर्वांनी एकविचाराने सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक बिनविरोध करावी, असं राजन पाटील यावेळी म्हणाले. दरम्यान, भाजपचे माजी आमदार राजन पाटील यांनी केलेल्या या आवाहनाला विरोधकांकडून कसा प्रतिसाद मिळतोय, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



राजन पाटील यांचे विरोधकांना आवाहन- जवळपास १० वर्षांच्या प्रशासकीय काळानंतर येत्या महिन्याभरात सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी भाजपसह इतर पक्षातील नेत्यांनी कंबर कसली आहे. निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली आहे. निवडणुकीची ही रणधुमाळी सुरु असतानाच भाजपकडून निवडणूक बिनविरोध होण्यासाठी आवाहन करण्यात आलं आहे. भाजप नेते आणि सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील यांनी विरोधकांना निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी आवाहन केलं आहे.

राजन पाटील विरोधकांना आवाहन करत म्हणाले की, राज्यातील दुष्काळ परिस्थिती पाहता सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक बिनविरोध करा. सोलापूर बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, असा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा मानस आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नेत्यांनी घालून दिलेली बिनविरोधाची परंपरा पुढच्या पिढीतील नेत्यांनीही आत्मसात करावी अशी आमची इच्छा आहे, असं मत भाजप नेते आणि माजी आमदार राजन पाटील यांनी व्यक्त केलंय . भाजप नेते राजन पाटील यांनी केलेल्या आवाहनाला विरोधकांकडून कसा प्रतिसाद मिळतोय, हे पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे.

## जल जीवनची १२० कोटींची बिले थकली; संतप्त ठेकेदारांचो सीईओंच्या दालनासमोरच ठिय्या

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागात पाणी पुरवठ्याची कामे पूर्ण करूनही तब्बल १२० कोटी रुपयांची देयके दोन वर्षांपासून रखडल्याने मंगळवारी (दि.२२) ठेकेदारांचा संयम सुटला.

बिलांच्या मंजुरीसाठी संतप्त ठेकेदारांनी सोलापूर जिल्हा परिषदेत आक्रमक पवित्रा घेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनासमोर थेट ठिय्या आंदोलन केले.



जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील वाड्या-वस्त्यांवर पिण्याचे पाणी पोहोचवण्यासाठी जल जीवन मिशन योजनेतून मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेण्यात आली होती. ठेकेदारांनी स्वतःकडील भांडवल पणाला लावून, वित्तसंस्थांकडून मोठ्या व्याजाने कर्जे काढून आणि साहित्य पुरवठादारांकडून उधारीवर वस्तू उचलून ही कामे वेळेत पूर्ण केली. मात्र, मार्च २०२३ पासून सुमारे ४३ कामांची देयके जिल्हा परिषद प्रशासनाकडून अद्याप वितरित करण्यात आलेली नाहीत.

या संदर्भात प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. अनेक निवेदने देऊनही अधिकाऱ्यांकडून केवळ पोकळ आश्वासने दिली जात असल्याने ठेकेदारांच्या संयमाचा बांध फुटला, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामीण पाणी पुरवठा कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष मोतीलाल राठोड यांनी व्यक्त केली.

बिले वेळेत न निघाल्यामुळे कामगारांची दैनंदिन मजुरी देणे अशक्य झाले आहे. दुसरीकडे साहित्य पुरवठादार आणि वित्तसंस्थांच्या कर्जाचे हप्ते थकल्याने त्यांच्याकडून तगादा सुरू झाला आहे. परिणामी अनेक ठेकेदार आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत. कामे पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने दबाव आणला जातो; मात्र कामाची पूर्तता झाल्यावर वर्षानुवर्षे बिले का अडवून ठेवली जातात, असा प्रश्न आंदोलकांनी उपस्थित केला. जोपर्यंत थकीत बिलांपोटी ठोस लेखी निर्णय होत नाही, तोपर्यंत दालनासमोरून हटणार नाही, असा पवित्रा त्यांनी घेतला.

या आंदोलनामुळे जिल्हा परिषदेत काही काळ तणाव निर्माण झाला होता. अखेर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ठेकेदारांच्या शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा करून शासन स्तरावर पाठपुरावा करत लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.

मात्र, बिले न मिळाल्यास कामे बंद आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. या आंदोलनात अतुल खुळे, प्रशांत गायकवाड, नितीन कागदे, प्रकाश पवार, अनिकेत पवार, सागर पवार, पद्मसिंह पाटील, सुरेश धुमाळ, राजकुमार खुर्द आणि तुषार पाटील आदी ठेकेदार सहभागी झाले होते.

## आळजापूर वन परिक्षेत्रात नेमकं चाललंय काय?
## वृक्षतोडीच्या दाव्याने वन विभागावर प्रश्न

करमाळा (कटूसत्य वृत्त):- तालुक्यातील आळजापूर येथील वनपरिक्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरू असल्याचा दावा ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. गेल्या सुमारे दहा दिवसांपासून दिवसाढवळ्या मशीनच्या साहाय्याने झाडे तोडली जात असून, सायंकाळनंतर तोडलेले लाकूड वाहनांमधून बाहेर नेले जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या प्रकाराकडे वन विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही ग्रामस्थांकडून केला जात आहे.



दरम्यान, याच आळजापूर वनपरीक्षेत्रात काही महिन्यांपूर्वीही वृक्षतोडीचे प्रकरण समोर आले होते. त्यावेळी तब्बल दोन महिने वृक्षतोड सुरू असल्याचे प्रकरण चर्चेत आले होते. त्यानंतर वन विभागाने कारवाई करत १९ आरोपींना अटक केली होती. न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली होती. त्यानंतर सुमारे १५ दिवसांत संबंधित आरोपींची जामिनावर सुटका झाल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, या घटनेला सुमारे तीन महिने उलटूनही संबंधित प्रकरणात अद्याप चार्जशीट दाखल झालेली नसल्याची माहिती मिळत असल्याने या कारवाईच्या पुढील प्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

या प्रकरणाची अधिकृत स्थिती मात्र संबंधित विभागाकडून स्पष्ट होणे आवश्यक आहे. सध्या पुन्हा वृक्षतोड सुरू असल्याचा ग्रामस्थांचा दावा आळजापूर वनपरिक्षेत्रात सध्या सकाळच्या वेळेत मशीनच्या साहाय्याने झाडांची तोड केली जात असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. दिवसभरात तोडलेले लाकूड सायंकाळनंतर वाहनांमधून नेले जात असल्याचाही दावा करण्यात येत आहे. त्यामुळे वन विभागाच्या हद्दीत अशा प्रकारे वृक्षतोड होत असल्यास संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून याची दखल घेतली जात आहे का, असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

विशेष म्हणजे, यापूर्वी याच परिसरात वृक्षतोडीचे प्रकरण समोर येऊन कारवाई झालेली असतानाही पुन्हा अशाच प्रकारची घटना घडत असल्याचा ग्रामस्थांचा दावा आहे. त्यामुळे वन विभागाने या प्रकरणाची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी आणि वृक्षतोड होत असल्याचे आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. या वृक्षतोडीबाबत वन विभागाची अधिकृत भूमिका आणि सध्या कोणती कारवाई करण्यात आली आहे, हे स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे.




पाहिजेत

वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य यांच्या संयुक्त विद्यमाने एक अभिनव व अनोखी योजणा राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजणा यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| २) | सह/उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ३) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ४) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ५) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छुक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ५० वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार सदर संस्थेकडे राखीव राहतील व ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. सदर संस्थेचा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेऊनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

संपर्क :- वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, महिंद्रा शोरुमसमोर, होटगी रोड, सोलापूर-४१३००३.

मो. ९६५७०६९०६९, ९४०३४६३०७९

# संपादकीय

## पुन्हा दप्तराचे ओझे!

राज्यातील सरकारी, अनुदानित आणि खासगी अशा सर्व शाळांसाठी विद्यार्थ्यांच्या वजनाच्या १० टक्क्यांपेक्षा दप्तराचे ओझे अधिक नसावे हा नियम लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दफ्तराचे ओझे हा शिक्षण व्यवस्थेला जडलेला जुना आजार आहे. अधिक पुस्तके, अधिक वह्या, अधिक गृहपाठ आणि अधिक तास म्हणजे अधिक दर्जेदार शिक्षण, या समजुतीने शाळकरी मुलांच्या पाठीवरचे वजन चढवले. प्रत्यक्षात शिक्षणाचा दर्जा दप्तराच्या वजनामध्ये मोजता येत नाही. मुलाला किती माहिती वाहून न्यावी लागते यापेक्षा ती किती समजते, तिचा वापर करता येतो का आणि शाळेविषयी कुतूहल टिकते का, हे अधिक महत्त्वाचे असते. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्याच्या वजनाच्या १० टक्क्यांपेक्षा दप्तराचे ओझे अधिक नसावे, हा राज्याचे प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक शरद गोसावी यांनी पुन्हा दिलेला आदेश महत्त्वाचा ठरतो. आरोग्यविषयक सूचना म्हणून तो जितका महत्त्वाचा आहे, तितकाच तो आपल्या शिक्षणपद्धतीच्या जुन्या सवयींचा फेरविचार करण्याची संधीही आहे. अर्थात, हा निर्णय अचानक आलेला नाही. महाराष्ट्राने २०१५ मध्येच विद्यार्थ्यांच्या वजनाच्या सुमारे १० टक्क्यांपर्यंत दप्तराचे वजन मर्यादित ठेवण्याचे विस्तृत निर्देश दिले होते. पुढे केंद्र सरकार आणि एनसीईआरटीच्या 'स्कूल बॅग पॉलिसी २०२०'मध्येही हाच निकष स्वीकारण्यात आला. त्या धोरणानुसार पूर्वप्राथमिक वर्गातील मुलांना दप्तरच नसावे; इयत्ता पहिली आणि दुसरीसाठी साधारण १.६ ते २.२ किलो, इयत्ता तिसरी ते पाचवीसाठी १.७ ते २.५ किलो, इयत्ता सहावी आणि सातवीसाठी २ ते ३ किलो, इयत्ता आठवीसाठी २.५ ते ४ किलो आणि इयत्ता नववी व दहावीसाठी २.५ ते ४.५ किलो अशी मार्गदर्शक वजनमर्यादा सुचविण्यात आली. मूलभूत नियम मात्र एकच दप्तर विद्यार्थ्याच्या शरीराच्या वजनाच्या १० टक्क्यांपेक्षा जड नसावे.

या विषयाला न्यायालयीन इतिहासही आहे. दप्तराच्या वजनासंदर्भातील जनहित याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या उपाययोजनांचा वेळोवेळी आढावा घेतला. २०१६ मध्ये सरकारने न्यायालयाला दिलेल्या माहितीनुसार २,४६३ अधिकार्यांनी १७,२३५ शाळांची पाहणी करून ३,९४,२९९ विद्यार्थ्यांची दप्तरे तपासली होती. त्यापैकी ३,४४,८२० दप्तरे निर्धारित मर्यादेत असल्याने सरकारने ८७.४५ टक्के अंमलबजावणी झाल्याचे सांगितले होते. न्यायालयानेही लक्षणीय अंमलबजावणी झाल्याचे नोंदवले; त्याच वेळी किती पुस्तके विद्यार्थ्यांनी आणावीत, हा निर्णय शिक्षणतज्ज्ञांनी घ्यावा, अशी रास्त भूमिका घेतली. पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था न करता मुलांना पाण्याची बाटली आणण्यास मनाई करणेही योग्य ठरणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले होते.

म्हणजेच जवळपास दशकभरापासून प्रश्न माहीत आहे, नियमही आहेत आणि उपायसुद्धा माहीत आहेत. तरी दप्तर पुन्हा जड का बनले? याचे उत्तर अंमलबजावणीपेक्षा शिक्षणाच्या रचनेत दडलेले आहे.

पाठ्यपुस्तकासोबत कार्यपुस्तिका, स्वतंत्र वर्गवही, गृहपाठाची वही, मार्गदर्शिका, संदर्भपुस्तके, प्रकल्पाचे साहित्य, डबा, पाण्याची बाटली आणि काही शाळांमध्ये डिजिटल उपकरणे अशी भर पडत जाते. दिवसाच्या वेळापत्रकाचा आणि दप्तराचा परस्पर संबंध नसेल, तर प्रत्येक विषयाचे साहित्य रोज नेण्याची वेळ मुलांवर येते. हे लक्षात घेऊन नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अभ्यासक्रमातील आशय कमी करून अनुभवाधारित, कृतिप्रधान आणि आकलनकेंद्री शिक्षणावर भर आहे. दप्तराचा प्रश्न आरोग्याशी जोडला की तो अधिक गंभीर होतो. एनसीईआरटीच्या धोरणाने विविध संशोधनांचा आधार घेत १० टक्क्यांचा निकष स्वीकारला आहे. बालरोगतज्ज्ञ आणि अस्थिविकारतज्ज्ञांच्या मते, वाढत्या वयातील मुलांच्या मणक्यावर आणि खांद्यांवर सातत्याने पडणारा अतिरिक्त भार हा पाठीच्या कण्याच्या नैसर्गिक वाढीवर विपरीत परिणाम करू शकतो. यामुळे पाठदुखी, मानदुखी, खांदे झुकणे, चुकीची शारीरिक ठेवण तयार होणे यांसारख्या समस्या लहान वयातच निर्माण होण्याचा धोका असतो. याशिवाय जड दप्तर उचलून शाळेत ने-आण करण्याने येणारा शारीरिक थकवा हा मुलांच्या शिकण्याच्या उत्साहावर आणि एकाग्रतेवरही परिणाम करतो. भारतामधील प्रत्यक्ष पाहणीही चिंताजनक चित्र दाखवते. पुणे आणि हैदराबादमधील १,३२१ विद्यार्थ्यांवर झालेल्या एका अभ्यासात इयत्ता पहिली ते दहावीमधील अभ्यासासाठी पात्र ९३५ विद्यार्थ्यांपैकी ७२२ म्हणजे ७७.२ टक्के विद्यार्थी निर्धारित निकषांपेक्षा जड दप्तर वाहत असल्याचे आढळले.

नियम आणि प्रत्यक्ष व्यवहारातील अंतर किती मोठे असू शकते, याचा हा महत्त्वाचा संकेत आहे. त्यामुळे नव्या आदेशाचे यश विद्यार्थ्यांचे दप्तर वजनकाट्यावर ठेवण्यात नाही, तर दप्तर जड होण्याची कारणे कमी करण्यात आहे. एनसीईआरटीच्या धोरणात प्रत्येक शाळेत डिजिटल वजनकाटा ठेवून नियमित तपासणी करण्याची शिफारस आहे.महाराष्ट्रातील ताज्या निर्देशांतही अचानक तपासणी, वेळापत्रकानुसार आवश्यक तेवढीच पुस्तके-वह्या आणणे आणि अनावश्यक शैक्षणिक साहित्य टाळणे अपेक्षित आहे. परंतु एवढ्यावर भागणार नाही. एका दिवसात ६ विषय असतील आणि प्रत्येकासाठी पाठ्यपुस्तक, वही व कार्यपुस्तिका आवश्यक असेल, तर काय करणार? अशा वेळी वेळापत्रकाची पुनर्रचना करून एका दिवशी कमी विषयांचे सखोल अध्यापन, सत्रानुसार पाठ्यपुस्तकांचे विभाजन, शाळेतच ठेवता येणार्या पुस्तकांसाठी कपाटे किंवा लॉकर, चित्रकला-खेळ-संगणकासाठी स्वतंत्र पुस्तके घरी नेण्याची सक्ती टाळणे आणि अनावश्यक खासगी कार्यपुस्तिकांवर नियंत्रण हे उपाय अधिक परिणामकारक ठरतील.

राजस्थानने २०२६-२७ पासून प्राथमिक वर्गांची पुस्तके सत्रनिहाय विभागून अनेक विषय एकाच खंडात समाविष्ट करण्याचा प्रयोग केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्याला एका सत्रासाठी आवश्यक पुस्तकच वाहून न्यावे लागते. अशा रचनात्मक उपायांतूनच दफ्तराचे ओझे खरोखर कमी होते. पालकांचीही भूमिका आहे. 'जास्त पुस्तके म्हणजे जास्त चांगली शाळा' या चुकीच्या मानसिकतेतून पालकांनी बाहेर पडायला हवे.दुसरीकडे शाळांनी दप्तर हलके करण्याच्या नावाखाली मुलांना महागडे टॅबलेट किंवा इतर डिजिटल उपकरणे खरेदी करण्यास भाग पाडणे हेदेखील यावरचे उत्तर नाही. दप्तराच्या वजनाची तपासणी शिक्षण विभागाने केवळ एखाद्या मोहिमेपुरती ठेवू नये. प्रत्येक शाळेत महिन्यातून किमान एकदा वेगवेगळ्या वर्गांतील विद्यार्थ्यांची अचानक नमुना तपासणी, त्याची नोंद आणि वारंवार नियमभंग करणार्या शाळांकडून सुधारणा आराखडा मागविणे आवश्यक आहे. मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालक प्रतिनिधींची जबाबदारी निश्चित केली तर आदेश कागदावर राहणार नाही.

# फुकटची शाळा




कालपरवा झालेल्या शिक्षक भरतीतील शेजारची मुलगी पेढे घेऊन आली. आम्ही गप्पा मारताना मुलंही शेजारी होती. मुलगी गेल्यानंतर माझा तीसरीत शिकणाऱ्या मुलाने विचारले फुकटच्या शाळेत दिदि शिकवणार ना ? म्हणजे... तर त्याने उत्तर दिले की माझी शाळा पैसे भरून व गावाकडची शाळा फुकटची ना ? अहो बाबा 'मराठी शाळा ना' आई जशी फुकटच्या शाळेत शिकवते तसे ना ? हे ऐकून मन सुन्न झाले. म्हणजे या मुलांची जिल्हा परिषद शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोन इतका बदलला की फुकटची शाळा आणि पैशाची शाळा बरे ती शाळा, शाळेतील मुलं व शिक्षक हे फुकटचे.

मला मान्य आहे परिस्थिती बदलली कि पिढी बदलती आणि त्यांचे विचारही बदलतात पण इतके ? ज्या शाळेत आमची पिढी शिकली, नोकरीला लागली, कुटुंब स्थिरस्थावर झाले त्या शाळांच्या बाबतीत या मुलांचे विचार ऐकून कसतरी झाले. खरंच आज मुलांची मानसिकता बदलली आहे याला जबाबदार कोण ? समाज, शासन, पालक कि शिक्षक. मराठी शाळा या शब्दाची लवकरच दुर्मीळ गोष्टींमध्ये नोंद करावी लागेल अशी स्थिती सध्या आहे ! मराठी शाळा किंवा मराठी भाषाचे ही स्थिती आपण होताना पाहतो आहोत याला कारणीभूत दुसरं कोणी नसून आपण स्वत:च आहोत.

मराठी भाषिकांमध्ये विविध कारणांनी मुलांना इंग्रजी भाषेत शिकवण्याची प्रथा रूढ झाली आहे. स्पर्धेचे युग, मराठी शाळेत शिकून पुढे काही भविष्य नाही, इंग्रजीशीवाय पुढे जाता येणार नाही, मराठी शाळेत स्वच्छता नसते, शिक्षक सारखं बाहेर किंवा मोबाईल वर असतात अशी वेगवेगळी कारणं सागून आपण आपल्या मुलांना इंग्रजी शाळांमध्ये घालतो. याचा परिणाम म्हणून मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

यावर कढी म्हणून 'मराठी शाळांचा दर्जा घसरला आहे, मुलांना तिथे चांगली संगत मिळत नाही, शिक्षक चांगले नसतात वगैरे वगैरे' क्षणीक मराठी शाळांवरील हे आरोप मान्य करू, पण जर मराठी शाळांची हि स्थिती आली असेल तर याला जबाबदार कोण?

शिक्षकांचे मुख्य काम काय? या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे आहे. विद्यार्थ्यांना शिकवणे, त्यांच्या ज्ञानाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे.

पण आज परिस्थिती अशी निर्माण केली की त्यांच्या हातात सतत वेगवेगळ्या अशैक्षणिक कामांची यादी दिली जाते. परिणामी शिक्षक वर्गात असूनही विद्यार्थ्यांपासून दूर जातो. शिक्षणाचा तास कागदपत्रे, ऑनलाइन नोंदी, सर्वेक्षणे, विविध अहवाल आणि प्रशासकीय कामांमध्ये हरवून जातो. आम्हाला शिकवू द्या, शाळा टिकू द्या. असे म्हणत शिक्षकांनी काळ्या फिती लावून काम केले.

तब्बल ५० पेक्षा जास्त प्स आणि संकेतस्थळावर अहवाल, नोंदी, वेगवेगळ्या अभियानाचा प्रचार, सर्वेक्षणी, परीक्षा पे चर्चा, सरकारी व खाजगी प्रशिक्षणे तसेच वरिष्ठ पातळीवरून व्हॉट्सअपद्वारे रात्रीतून नवनव्या उपक्रमांचे आदेश, उपक्रम राबवा, फोटो, व्हिडिओ टाका, लिंक भरा. तसेच निवडणूक, जनगणना, मतदार याद्या इत्यादी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून नेमून दिलेली कामे आहेतच. हा सगळा पसारा सांभाळून शिक्षकांनी वर्गात कधी जायचे ? कधी शिकवायचे ? हे शासनास कधी कळणार. आज सकाळीच एक बातमी वृत्तपत्रात वाचली आता शिक्षक आरोग्य दूत म्हणून काम करणार वारे वा राज्य सरकार.

मराठी शाळा ह्या सरकारी अनुदानावर चालतात त्यामुळे सरकारी नियम, कामांचे काटेकोरपणे पालन करावे लागते. गेल्या अनेक वर्षांत शासकीय धोरणे ही मराठी शाळांची गळचेपी करून इंग्रजी शाळांचं व संस्थाचालकांच चांगभलं करताना दिसत असले तरी आता बऱ्याच मराठी शाळा या आधुनिक होऊन आर्थिक व अनेक आव्हानाला धाडसाने सामोऱ्या जात आहेत. इतर शाळांशी स्पर्धा करत विविध कल्पक व नाविन्यपूर्ण उपक्रम, राबवून शाळेचा शैक्षणिक गाडा हाकत आहेत. केवळ मोफत शिक्षण मिळते या एकाच निकषातून पाहतात.

शाळा मोफत आहे म्हणून तिचे शिक्षण कमी दर्जाचे ठरते का? नक्कीच नाही. शिक्षणाची किंमत फीच्या पावतीवर ठरत नसते. शिक्षणाची खरी किंमत विद्यार्थ्याच्या ज्ञानात, संस्कारात, आत्मविश्वासात आणि भविष्यात दिसते. ज्या मराठी शाळेत आपण शिकलो त्या शाळेकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलू म्हणजे मुलांचा आपोआप बदलेल......

**प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी**
**९२२६१४४८३६ अकलूज.**
**(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)**

## * पान १ वरुन *

*** पदवीधर-शिक्षक मतदारसंघांच्या.....**
त्यामुळे राजकीय पक्ष, उमेदवार आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांना निवडणूक आयोगाच्या नियमांचे पालन करावे लागणार आहे.

पुणे विभागातील दोन्ही मतदारसंघांसाठी आता निवडणूक प्रक्रियेची औपचारिक सुरुवात झाली असून २९ सप्टेंबरला अधिसूचना, ६ ऑक्टोबरला अर्ज दाखल करण्याची मुदत संपणार, ९ ऑक्टोबरला माघारीची अंतिम तारीख, २३ ऑक्टोबरला मतदान आणि २७ ऑक्टोबरला मतमोजणी असा निवडणुकीचा टप्प्याटप्प्याने कार्यक्रम आहे.

त्यामुळे दिवाळीपूर्वी पुणे विभागातील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या राजकीय चित्राला नवे वळण मिळणार असून, मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने जातो, याकडे राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# कर्मवीर कृषी महाविद्यालयात दीक्षारंभ



बार्शी (कटूसत्य वृत्त):- श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम वर्ष बी.एस्सी. (ऑनर्स) कृषीच्या विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ समारंभ उत्साहात पार पडला.

मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे (बापू) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

त्यांनी कृषी शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, रोजगाराच्या संधी आणि स्पर्धा परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जे. डी. जाधव होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, परिश्रम व आत्मविश्वासाने प्रगती साधण्याचे आवाहन केले.

यावेळी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करून भेटवस्तू दिल्या. तसेच द्वितीय व तृतीय वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता महाविद्यालयातर्फे आयोजित सस्नेहभोजनाने झाली.

यावेळी कार्यालयीन अधीक्षक टी. एस. मोरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा. डॉ. संतोष शेंडे, डॉ. महेश गुरव, प्रा. गणेश जाधव व प्रा. शाम आरगडे यांनी परिश्रम घेतले.

# ४०० ब्रास मुरूमाचे अवैध उत्खनन; दोघांविरुद्ध गुन्हा



टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- टेंभुर्णी पासून जवळच असलेल्या टेंभुर्णी,-

पंढरपूर रोड लगत माढा तालुक्यातील अकोले बुद्रुक येथे शासकीय गायरान जमीन गट क्रमांक २४४ व खासगी जमीन गट क्रमांक २५६ मध्ये जेसीबी मशीनच्या साहाय्याने अवैधरित्या उत्खनन करून अंदाजे ४०० ब्रास मुरूम वाहतूक करून नेल्याप्रकरणी श्री दत्त कन्स्ट्रक्शन, सोलापूरचे प्रोप्रायटर प्रमोद मोरे व प्रतिनिधी महेश मोरे, दोघेही रा. कुरूनूर,

ता. अक्कलकोट, जि. सोलापूर, यांच्याविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी अकोले बुद्रुकचे ग्राममहसूल अधिकारी उमेश जगन्नाथ बनसोडे यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, २७ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २.३० वाजण्यापूर्वी अकोले बुद्रुक येथील गट क्रमांक २४४ मधील शासकीय गायरान जमीन व गट क्रमांक २५६ मधील खासगी जमीन, त्यातील सुरज भालचंद्र पाटील यांच्या शेतात जेसीबीच्या साहाय्याने खड्डे घेऊन मुरूमाचे अवैध उत्खनन करण्यात आले.

त्यानंतर अंदाजे ४०० ब्रास मुरूम वाहतूक करून नेण्यात आला असून, त्याची किंमत अंदाजे २ लाख ४० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. संबंधितांनी स्वतःच्या फायद्यासाठी मुरूमाची चोरी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. वरिष्ठ कार्यालयाकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर वरिष्ठांच्या आदेशाने १९ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १.५८ वाजता टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६९८/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), ३(५) सह पर्यावरण संरक्षण कायदा कलम ९, १५ तसेच भारतीय गौण खनिज कायदा कलम ४(१), ४(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजकुमार भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल दत्तात्रय वाघमारे करीत आहेत.

गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलीस हेड कॉन्स्टेबल निलेश काशीद यांनी केली असून, अवैध उत्खनन, मुरूम वाहतूक आणि संबंधित प्रकरणातील तपास पोलिसांकडून पुढे चालू आहे.

**वात्रटिका**

दशा आणि दिशा

दोषी कोण च्या शोधत
वाटते दिशा भरकटू नये...
वागणे नेक ठेवावे असे की
त्यास राजकीय वास वाटू नये...।।
आशीर्वादाचा हात उंचावणाऱ्या
मातोश्रीच्या हाती नोटीस आली...
अब्रुची नुकसान भरपाई कोटीत
मागून मातोश्री वेठीस धरली...।।

**हणमंत पडवळ -धाराशिव**
**८६९८०६७५६६**

# विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा,शिस्त आणि सातत्य हाच यशाचा खरा मार्ग-प्रशांत डगळे




पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात यश संपादन करण्यासाठी प्रेरणा, शिस्त आणि सातत्य या तीन सूत्रांचा अंगीकार करणे अत्यंत आवश्यक आहे. हे तीन अत्यंत महत्त्वाचे स्तंभ आहेत.

प्रेरणा तुम्हाला कामाची सुरुवात करण्यास मदत करते, शिस्त तुम्हाला योग्य मार्गावर ठेवते आणि सातत्य तुम्हाला अंतिम ध्येयापर्यंत पोहोचवते असे प्रतिपादन सहा पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले. गणेशोत्सवानिमित्त आयोजित लोकसंवाद २०२६ उपक्रमांतर्गत चिंचणी (ता.पंढरपूर) येथील वरदायिनी गणेशोत्सव मंडळ येथे शासनाकडून विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधाबाबत श्री. डगळे यांनी संवाद साधला यावेळी सहा. पोलीस अधिक्षक डगळे म्हणाले, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ बुद्धिमत्ता पुरेशी नसून, या तीन स्तंभांच्या बळावरच विद्यार्थी आपले ध्येय साध्य करू शकतात, प्रेरणा ही विद्यार्थ्याला एखाद्या कामाची किंवा अभ्यासाची सुरुवात करण्यास मदत करते. ती अंत:करणातून येणे गरजेचे आहे. मात्र, केवळ प्रेरणेवर विसंबून चालत नाही; त्यासाठी शिस्तीची जोड असावी लागते. शिस्त विद्यार्थ्याला योग्य मार्गावर ठेवते, वेळेचे नियोजन शिकवते आणि अभ्यासातील लक्ष विचलित होऊ देत नाही. प्रेरणेने सुरू केलेले काम शिस्तीने पुढे नेले तरीही अंतिम यशासाठी सातत्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. सातत्यच विद्यार्थ्याला त्याच्या अंतिम ध्येयापर्यंत पोहोचवते.विद्यार्थ्यांनी केवळ गुणांमागे न धावता या तीन मूल्यांना आपल्या दैनंदिन जीवनाचा हिस्सा बनवावे, जेणेकरून ते एक आदर्श आणि यशस्वी नागरिक बनू शकतील, असा संदेश या प्रसंगी देण्यात आला.

तसेच चिंचणी या पुर्नवसीत गावातील नागरिकांनी गावाच्या विकासात्मक कामात सातत्य राखल्याने याठिकाणच्या नागरिकांना तसेच बाहेरुन येणाऱ्या पर्यटकांना उत्तम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

चिंचणी गावाने केलेल्या विकासामुळे राज्य शासनाचे विविध पुरस्कार प्राप्त झाले असल्याचे गौरवोध्दार देखील त्यांनी काढले. यावेळी कार्यक्रमास मोहन अनपट,शशिकांत सावंत, चंद्रकांत पवार, शरद सावंत तसेच चिंचणी ग्रामस्थ व विद्यार्थि उपस्थित होते.

# ओव्हरटेक करताना स्कॉर्पिओचा कंटेनरला धडक,चालकाचा मृत्यू



टेंभुर्णी(कटूसत्य वृत्त):- मोहोळहून टेंभुर्णीकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या स्कॉर्पिओ चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने समोरील कंटेनरला पाठीमागून सोमवार दि.२१ सप्टेंबर रोजी दुपारी सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास सापटणे (टें) येथे जोरदार धडक दिली.या अपघातात स्कॉर्पिओ चालक करण महेश पवार वय २२, रा. कुंभार गल्ली,भाजी मंडई, मोहोळ याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. तर आंबुबाई देवकर,उज्वला देवकर,अश्विनी यांना किरकोळ दुखापत झाली असून अनिकेत धोतरे व रोहित हे गंभीर जखमी झाले आहेत. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ एन क्र. एमएच ४२ बीएन ५११२ ही गाडी मोहोळहून टेंभुर्णीकडे जात होती.सापटणे (टें) गावाच्या शिवारात बाबाराजे हॉटेलजवळ आल्यानंतर चालक करण पवार हा समोरील टिपरला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करीत होता.यावेळी त्याचा वाहनावरील ताबा सुटल्याने स्कॉर्पिओची समोरील कंटेनरला पाठीमागून डाव्या बाजूने जोरदार धडक बसली.या धडकेत करण पवार गंभीर जखमी झाला.त्याला उपचारासाठी ग्रामीण रुणालय येथे नेले असता उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.याप्रकरणी आंबुबाई नवनाथ देवकर वय ५०, रा. कुंभार गल्ली, भाजी मंडई, मोहोळ यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पुढील तपास पोलीस हवालदार गणेश जगताप करीत आहेत.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३
फोन- २१७३५५०५९२ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः अॅड.खतीब वकील.**
It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-2173550592 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No . MAHMAR 2006/17624**

# मोहोळ येथे 'लोकसंवाद २०२६ अंतर्गत गणेशोत्सव मंडळात शासकीय योजनांची जनजागृती

सोलापूर(कटूसत्य वृत्त):- 'लोकसंवाद २०२६ या उपक्रमांतर्गत मोहोळ येथील अहिल्यादेवी गणेशोत्सव मंडळात जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने विविध शासकीय योजना, उपक्रम आणि जनकल्याणकारी कार्यक्रमांची माहिती गणेशभक्त व नागरिकांना देण्यात आली. शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने गणेशोत्सव मंडळांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. यावेळी नागरिकांना शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या लोककल्याणकारी योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांनी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी 'लोकसंवाद २०२६ या उपक्रमाचा उद्देश, त्याअंतर्गत राबविण्यात येणारे विविध जनजागृती उपक्रम



तसेच शासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची माहिती देण्यात आली. गणेशोत्सव हा मोठ्या प्रमाणात लोकसहभाग असलेला उत्सव असल्याने या माध्यमातून शासनाच्या योजना आणि उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

यावेळी 'बाप्पा डॉट ओआरजी' (bappa.org) या संकेतस्थळाचीही माहिती देण्यात आली. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच घरगुती गणेशोत्सव साजरा करणाऱ्या नागरिकांनी आपल्या गणेशोत्सवातील कथा, सामाजिक उपक्रम, देखावे, फोटो आणि व्हिडिओ संकेतस्थळावर अपलोड करण्याचे आवाहन माहिती कार्यालयाच्या वतीने सर्वसाधारण सहाय्यक संजय घोडके यांनी केले.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक संदेश, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, जनजागृती आणि लोकसहभागाचे उपक्रम व्यापक स्तरावर पोहोचविण्यासाठी या उपक्रमात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी अहिल्यादेवी गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अंश गावढे, उपाध्यक्ष रुद्र सोनार, माजी नगरसेवक अतुल गावढे, सचिव नवनाथ माळी, सहसचिव रामू गावढे, खजिनदार ओम गिड्डे, माजी सरपंच अशोक भाऊसाहेब देशमुख, आप्पासाहेब बाळासाहेब देशमुख, प्रकाश शिवाजीराव देशमुख आणि ओंकार देशमुख यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व गणेशभक्त उपस्थित होते. 'लोकसंवाद २०२६ माध्यमातून शासनाच्या योजना, सेवा आणि उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.

गणेशोत्सव मंडळांनी या उपक्रमात सहभागी होऊन आपल्या मंडळाच्या सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन करण्यात आले.

# सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचा ऑटोमेट इंजिनिअरिंगशी सामंजस्य करार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण, प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण आणि रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सोलापूर आणि पुणे येथील ऑटोमेट इंजिनिअरिंग यांच्यात सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे. महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागांचा या करारात सहभाग आहे. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमासोबत उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कार्यपद्धती समजून घेण्याची संधी मिळणार आहे. ऑटोमेट इंजिनिअरिंगकडून उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रम व प्रशिक्षण पद्धतीसाठी आवश्यक सूचना आणि मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच विद्यार्थी व



प्राध्यापकांसाठी औद्योगिक भेटी, प्रशिक्षण कार्यक्रम, कौशल्य विकास उपक्रम, तज्ज्ञांची व्याख्याने आणि फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम आयोजित करण्यास सहकार्य केले जाणार आहे. विशेषतः PLC, SCADA, Automation, IoT आणि Industrial IoT यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानावर संयुक्त संशोधन, कार्यशाळा आणि प्रशिक्षण घेण्यावर करारात भर देण्यात आला आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वर्ग प्रशिक्षणाबरोबरच प्रकल्पाधारित प्रशिक्षण देऊन प्रत्यक्ष औद्योगिक प्रकल्पांवर काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. करारानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पुण्यातील नऱ्हे इंडस्ट्रियल इस्टेट आणि कंपनीच्या प्रकल्प विभागांमध्ये सहा महिन्यांची पूर्णवेळ इंटर्नशिप करण्याची तरतूद आहे. इंटर्नशिप आणि प्लेसमेंटसाठी AICTE, विद्यापीठ तसेच व्यवस्थापनाच्या लागू नियमांनुसार सहकार्य करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक ज्ञान आणि उद्योगांच्या प्रत्यक्ष अपेक्षा यातील कौशल्य अंतर कमी करण्यास मदत होणार आहे.

महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. एस. डी. नवले, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाचे विभागप्रमुख डॉ. एस. एस. शिरगण, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. बिरादार, तर ऑटोमेट इंजिनिअरिंगच्या वतीने इन्स्टिट्यूट-इंडस्ट्री कोलॅबोरेशनचे संचालक अखिलेश देव यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख आणि रोजगारक्षम बनविण्यावर सिंहगड इन्स्टिट्यूटचा सातत्याने भर असून, ऑटोमेट इंजिनिअरिंगसोबत झालेला हा सामंजस्य करार त्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. या उद्योग-शैक्षणिक सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, औद्योगिक वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव, इंटर्नशिप तसेच रोजगारक्षम कौशल्ये विकसित करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

# तालुकास्तरीय योगासन स्पर्धेत कल्याणशेट्टी शाळेचा घवघवीत यश

अक्कलकोट(कटूसत्य वृत्त):- येथे घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय योगासन स्पर्धेत कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. विविध योगासन प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. ट्रॅडिशनल योगासन प्रकारात १४ वर्षे मुलांमध्ये नरेंद्र रवींद्र कालीबत्ते व श्रीरंग गणेश फडतरे यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवला.

१४ वर्षे मुलींमध्ये भक्ती सिद्धाराम मोरडे- प्रथम, गौरी भीमाशंकर कामाठी- द्वितीय, वैष्णवी सुरेशकुमार माशाळे- तृतीय क्रमांक मिळवला. १७ वर्षे मुलांमध्ये शुभंकर अनंत मसलेकर



प्रथम तर वीरेंद्र विजयकुमार जोजन द्वितीय क्रमांकावर राहिले. १७ वर्षे मुलींमध्ये सिद्धी देविदास बाबर प्रथम व लक्ष्मी खिरानंद कणगी द्वितीय क्रमांकावर राहिल्या. रिदमिक योगासन प्रकारात १४ वर्षे मुलींमध्ये सोनाली विजय म्हेत्रे व कीर्तीकी सुरेश कवटगी यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवला. १४ वर्षे मुलांमध्ये श्रीरंग गणेश फडतरे प्रथम व नरेंद्र रवींद्र कालीबत्ते द्वितीय क्रमांकावर राहिले.

१७ वर्षे मुलांमध्ये कार्तिक सचिन रामशेट्टी प्रथम व विनायक मल्लिनाथ बगलेपाटील द्वितीय क्रमांकावर राहिले. आर्टिस्टिक सिंगल प्रकारात १४ वर्षे मुलींमध्ये भक्ती सिद्धाराम मोरडे, तर १७ वर्षे मुलींमध्ये सिद्धी देविदास बाबर यांनी प्रथम क्रमांक मिळवला. आर्टिस्टिक पेयर प्रकारात १४ वर्षे मुलींमध्ये भक्ती सिद्धाराम मोरडे व लक्ष्मी मारुती धर्मसाले, तर १७ वर्षे मुलींमध्ये धनश्री परमेश्वर पोलासे व फायका आसिफ बेग यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवला. १७ वर्षे मुलांच्या गटात कार्तिक सचिन रामशेट्टी व विनायक मल्लिनाथ बगलेपाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. वरील सर्व यशस्वी विद्यार्थी जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत पात्र झाले आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक श्रीशैल किणगी, कुमार जाधव,योग प्रशिक्षक चंद्रकांत बिराजदार यांचे कौतुकासह अभिनंदन करण्यात आले.

# सहकार महर्षि सारवर कारखाना राष्ट्रीय कार्यक्षमता पुरस्काराने सन्मानित

अकलूज (कटूसत्य वृत्त):- सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि. शंकरनगर अकलूज, या साखर कारखान्यास सन २०२५-२६ या गळीत हंगामात ऊस विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल राष्ट्रीय साखर कारखाना महासंघ, नवी दिल्ली या संस्थेने ऊस विकासाकरिता, उच्च साखर उतारा विभागातून सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना, राष्ट्रीय कार्यक्षमता तृतीय पुरस्काराने मंगळवार दिनांक २२/०९/२०२६ रोजी नवी दिल्ली येथे सन्मानित केले.

सदर पुरस्कार केंद्रीय रस्ते



वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, गुजरात राज्याचे सहकार मंत्री गुरजर, हरियाणा राज्याचे मंत्री डॉ.अरविंद कुमार शर्मा, राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते कारखान्याच्या संचालिका कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, कु.इशिता धैर्यशील मोहिते-पाटील, व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालक नानासाहेब मुंडफणे, विजयकुमार पवार, संचालिका सौ.सुजाता शिंदे, कार्यकारी संचालक सुहास यादव व मुख्य शेतकी अधिकारी रविराज चव्हाण यांनी पुरस्कार स्वीकारला.

कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याची वाटचाल प्रगतीपथावर असून,

सदर पुरस्काराने कारखान्याच्या नावलौकिकात भर पडली आहे. कारखान्याचे संचालक मंडळ, सभासद व कामगार यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# दोन दिवसांच्या पावसाने नातेपुतेकरांना दिलासा; बळीराजा सुखावला

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- नातेपुते शहर व परिसरात मागील दोन आठवड्यांपासून उन्हाचा कडाका आणि वाढलेल्या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले होते. दिवसभर जाणवणाऱ्या प्रचंड उष्णतेमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. मात्र, सोमवार (दि. २१ सप्टेंबर) पासून सलग दोन दिवस पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला असून, नातेपुतेकरांना उकाड्यापासून मोठा दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, पावसाच्या प्रतीक्षेत असलेला बळीराजाही या



पावसामुळे सुखावला आहे. मागील काही दिवसांपासून पावसाची अपेक्षा असलेल्या शेतकऱ्यांना पावसामुळे मोठा दिलासा मिळाला असून, शेतीतील पिकांना या पावसाचा फायदा होण्याची आशा निर्माण झाली आहे. पावसामुळे जमिनीतील ओलावा वाढण्यास मदत होणार असून, खरीप पिकांना त्याचा लाभ होईल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

शहरात पावसाच्या सरी कोसळताच वातावरणात कमालीचा बदल झाला. उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला असून, हवेत गारवा निर्माण झाल्याने वातावरण आल्हाददायक झाले आहे.नागरिकांना उकाड्यापासून दिलासा आणि शेतकऱ्यांना पिकांसाठी आशेचा किरण मिळाल्याने नातेपुते शहर व परिसरात दोन दिवसांच्या पावसामुळे समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वाडिया हॉस्पिटलमधील मेडिसिन आयसीयू व रेसिडेन्शिअल ब्लॉकचे लोकार्पण

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- एन. एम. वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटल, सोलापूर येथे नूतनीकरण करण्यात आलेल्या मेडिसिन आयसीयू आणि रेसिडेन्शिअल ब्लॉकचे लोकार्पण शनिवारी कै. उत्पल पटेल यांच्या पत्नी श्रीमती रिद्धी पटेल व त्यांच्या कुटुंबीयांच्या हस्ते करण्यात आले.

कै. उत्पल पटेल यांच्या स्मरणार्थ एन. एम. वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटलला देण्यात आलेल्या देणगीतून या दोन्ही सुविधांचे नूतनीकरण करण्यात आले आहे. मेडिसिन आयसीयूच्या



नूतनीकरणासाठी ७५ लाख रुपये, तर रेसिडेन्शिअल ब्लॉकच्या नूतनीकरणासाठी ५० लाख रुपये, अशी एकूण १ कोटी २५ लाख रुपयांची देणगी प्राप्त झाली आहे. या निधीचा उपयोग रुग्णसेवा अधिक सक्षम करण्यासाठी करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. शिरीष कुमठेकर यांनी प्रास्ताविक करून नूतनीकरणाच्या कामाची माहिती दिली. यावेळी नेव्हिल नोरोन्हा यांनी आपल्या मनोगतात डी-मार्ट तसेच कै. उत्पल पटेल यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या सामाजिक योगदानाचा उल्लेख केला. आपल्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीचा यथायोग्य वापर करून त्याचा जनतेच्या आरोग्यसेवेसाठी उपयोग होत असल्याचे पाहून श्रीमती रिद्धी पटेल यांनी समाधान व्यक्त केले. या माध्यमातून कै. उत्पल पटेल यांच्या स्मृती जनसेवेशी जोडल्या गेल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास श्रीमती रिद्धी पटेल यांच्यासह त्यांचे कुटुंबीय, एन. एम. वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटलचे विश्वस्त, पदाधिकारी, डॉक्टर, कर्मचारी तसेच सेवाव्रती उपस्थित होते.


# शनिवारी सोलापूरात ५ वे नांदी साहित्य संमेलन

## शंभराव्या साहित्य संमेलनाची महाराष्ट्र साहित्य परिषद शाखेकडून नांदी

सोलापूर,(कटूसत्य वृत्त):- १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन जानेवारी २०२७ मध्ये होणार असून त्याबाबतची संपूर्ण महाराष्ट्रात जागृती आणि प्रसार होण्यासाठी महाराष्ट्रातील विविध शहर जिल्ह्यासह देश विदेशात महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, समर्थ युवा फौंडेशन, महाराष्ट्र राज्याचे मराठी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नांदी साहित्य संमेलन होणार आहेत त्याचाच भाग म्हणून सोलापूर मध्ये ५ वे नांदी साहित्य संमेलन शनिवार दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी लोमान्य टिळक सभागृह ॲम्फी थिएटर सोलापूर येथे आयोजित करण्यात आले आहे.

वामसी लॅब यांच्या सहकार्याने सोलापूर मध्ये नांदी संमेलन होणार आहे. अशी माहिती समन्वयक जितेश कुलकर्णी आणि यशवंत बिराजदार यांनी दिली.

सोलापूर मध्ये होत असलेल्या ५ वे नांदी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ लेखक रविंद्र गुर्जर असणार आहेत. तर स्वागताध्यक्ष वामसी लॅबचे मदना



केशव रेड्डी आहेत. भाषा अनुबंध या शिर्षकाखाली होत असलेले ५ वे नांदी साहित्य संमेलनाचे उदघाटन शनिवार दि. २६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष सिने अभिनेते योगेश सोमण यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी समर्थ युवा फौउंशनचे राजेश पांडे आणि वामसी लॅबचे मदना केशव रेड्डी यांच्यासमवेत सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उदघाटनानंतर सकाळी ११ वाजता निमंत्रित बहुभाषिक काव्य संमेलन त्यानंतर दुपारी १२.३० वाजता युवा कवी संमेलन.

त्यानंतर दुपारी ३ वाजता वेणुगोपाल संगीतालय यांचा सूर काही राहिले हा कार्यक्रम होणार आहे.

त्यानंतर सायंकाळी ६ वाजता समारोप आणि त्यानंतर सायंकाळी ७ वाजता लेखक दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांचा शिवरायांचा छावा हा कार्यक्रम होऊन नांदी साहित्य संमेलनाची सांगता होणार आहे.

पद्मश्री मारूती चित्तमपल्ली यांच्या नावाचे प्रवेशद्वार या नांदी साहित्य संमेलनात उभारण्यात आले असून सर्व कार्यक्रम कवी संजीव व्यासपीठावर होणार आहेत.

सोलापूर मध्ये होत असलेल्या या नांदी साहित्य संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या सोलापूरमधील, सोलापूर, जुळे सोलापूर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, पश्चिम सोलापूर, मोहोळ या शाखांच्यावर असून प्रा.डॉ.श्रुतीश्री वडगबाळकर, किशोर चंडक, प्रा.नरेंद्र काटीकर,पद्माकर कुलकर्णी, सायली जोशी, गिरीश दुनाखे,रेणुका महागांवकर, प्रशांत बडवे, जितेश कुलकर्णी, शिवजी शिंदे, उज्वला साळुंखे, संतोष साळुंखे, श्रीकांत मोरे, अस्मिता गायकवाड, राजशेखर शिंदे, डॉ.स्मिता प्रमोद पाटील, सुधीर नाईकनवरे, जयेश आराध्ये हे सर्व पदाधिकारी आहेत तर संयोन समिती मध्ये गोविंद काळे, डॉ. रामचंद्र धर्मसाले, डॉ. नितीन आवताडे, वंदना कुलकर्णी, शोभा बोल्ली, अश्विनी चव्हाण, अविनाश कामतकर, भिमगोंडा पाटील, बदीउज्जमा बिराजदार, दत्तात्रय पाटील, प्रमोद कोरे, अनिल देवसाले, प्रसिध्दीप्रमुख विनायक होटकर हे काम पाहणार आहेत.

या नांदी साहित्य संमेलनाला सोलापूरकरांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# आदर्श सार्वजनिक गणेशोत्सव मंडळात 'लोकसंवाद २०२६'अंतर्गत कृषी योजनांची माहिती

सोलापूर(कटूसत्य वृत्त):- 'लोकसंवाद २०२६' या उपक्रमांतर्गत आदर्श सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, मोहोळ येथे गणेशभक्त व ग्रामस्थांसाठी कृषी विभागाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती देण्यात आली.

यावेळी तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे यांनी कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

यामध्ये कृषी यांत्रिकीकरण, महाडीबीटी पोर्टल, महिला शेतकरी, ठिबक सिंचन, पॉलीहाऊस, कांदा चाळ, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना आदी योजनांचा समावेश होता.

शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी संबंधित विभागाशी संपर्क साधून योजनांची पात्रता, आवश्यक कागदपत्रे व अर्ज प्रक्रियेबाबत



माहिती घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश विस्तार अधिकारी सुदाम वसेकर यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विशद करून पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान देण्याचे आवाहन केले.

यावेळी उपस्थितांना पर्यावरण संरक्षणाची प्रतिज्ञाही देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व त्रसंचालन जिल्हा माहिती कार्यालयाचे शरद नलवडे यांनी केले. तर समारोप मोहोळ वार्ताचे संपादक राजू साखरे यांनी केला. बाप्पा डॉट ओआरजी (bappa.org) राज्य शासनाने गणेशोत्सवास राज्य महोत्सव म्हणून दर्जा दिला आहे. सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने ही राज्यातील गणेशोत्सवाची गौरवशाली परंपरा चे दस्तावेजीकरण करण्यासाठी bappa.org यावर गणेश मंडळांनी त्यांच्या गणेश मंडळाची माहिती, फोटो, रील्स तसेच

जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांनी ही त्यांच्या घरातील गणपती चे फोटो, रिल्स अपलोड करण्याबाबतचे आवाहन केले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी हनुमंत गावडे, सहाय्यक कृषी अधिकारी प्रशांत चव्हाण, सहाय्यक कृषी अधिकारी निखिल देशमुख, विस्तार अधिकारी सुदाम वसेकर, मंडळाचे मार्गदर्शक चंद्रकांत देवकाते यांच्यासह गणेशभक्त, ग्रामस्थ व मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.